महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन ज्ञापन क्रमांक : दुरुस्ती-०११८/प्र.क्र.६०/एक/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक : १६ मार्च २०१८.

विषय :- पोलीस अधीक्षक, जालना, यांच्या अधिपत्याखालील पोलीस ठाणे, अंबड, येथील दुरुस्तीची कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :- १) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.

२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.

३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ पो.ठाणे-अंबड-निवा.दुरुस्ती-जालना/ १६/ २०१८, दिनांक १६.०१.२०१८.

ज्ञापन.-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी पोलीस अधीक्षक, जालना, यांच्या अधिपत्याखालील पोलीस ठाणे, अंबड, येथील दुरुस्तीची पुढील कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे:-

अ.क्र. (१)	कामाचे नाव (२)	खर्चाचे अंदाज (३)
१	"Construction of cement concrete road and underground drainage line for Police quarters premises at Ambad."	रु. ९४,७४,९९०/-
२	"Repairs to Police quarters No.1 to 19 at Ambad."	रु. ६९,३७,२१६/-
३	"Repairs to P.I. quarters and Police quarters No.20 to 38 at Ambad."	रु. ७३,८९,७६७/-

२. उक्त खर्चाचे अंदाज हे उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबड यांनी सन २०१७-१८ च्या दरसूचीनुसार तयार केले असून ते कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना व पोलीस अधीक्षक, जालना, यांनी साक्षांकित केले आहेत.

३. उक्त खर्चाचे अंदाज हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी तपासले आहेत व ते पुढीलप्रमाणे सुधारित केले आहेत व त्याप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यास, विवक्षित अटींवर, सहमती दिली आहे:-

अ.क्र. (१)	कामाचे नाव (२)	खर्चाचे अंदाज (३)
१	"Construction of cement concrete road and underground drainage line for Police quarters premises at Ambad."	रु. ९७,३१,६५४/-
२	"Repairs to Police quarters No.1 to 19 at Ambad."	रु. ६९,४१,९५९/-
३	"Repairs to P.I. quarters and Police quarters No.20 to 38 at Ambad."	रु. ७३,९४,८१८/-
एकूण		**रु.२,४०,६८,४३१/-**

४. त्या अनुसार, पोलीस अधीक्षक, जालना, यांच्या अधिपत्याखालील पोलीस ठाणे, अंबड, येथील दुरुस्तीची परिच्छेद ३ मधील तक्त्यात नमूद केलेले कामे करण्यासाठी **रु.२,४०,६८,४३१/-** इतक्या खर्चाच्या अंदाजास, पुढील अटींवर, याद्वारे, प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

१) उक्त खर्चाचे अंदाज हे अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, जालना, यांनी साक्षांकित करणे आवश्यक आहे;
२) निधी उपलब्ध झाल्याशिवाय काम सुरु करु नये.

५. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग--मागणी क्र. बी-१, २०५५, पोलीस, (००) १०९, जिल्हा पोलीस, (००)(०१) जिल्हा पोलीस बल (अनिवार्य) (*दत्तमत*) (२०५५ ०१६८), २७, लहान बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.६५/इमा-२, दिनांक ३०.०१.२०१८, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०३१६१८३०२८११२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2018.03.16 18:31:46 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) विशेष पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद.
३) पोलीस अधीक्षक, जालना.

प्रत:-

१) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, जालना *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी सुधारित केलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*

२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी सुधारित केलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*

३) जिल्हा कोषागार अधिकारी, जालना.

४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.

५) कार्यासन अधिकारी (इमा-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.

६) कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (व्यय-७/विनियम), मंत्रालय, मुंबई.

७) निवड फाईल (पोल-७).